आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१४ मार्च २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री स्वनिधी योजनेच्या १ लाख लाभार्थ्यांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कर्ज वितरण
- देशातल्या ३२ राजकीय पक्षांचा एकाचवेळी निवडणुका घेण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा
- ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू यांची देशाचे नवे निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती
- शरद पवार यांचं नाव आणि फोटो न वापरण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे अजित पवार यांच्या पक्षाला आदेश

**आणि**

- राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधान परिषदेतल्या आमदार अपात्रता प्रकरणी उद्यापासून सुनावणी

**<><><><><>**

प्रधानमंत्री स्वनिधी योजना ही रस्त्यांवर व्यवसाय करणाऱ्यांची जीवनवाहिनी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आज त्यांच्या हस्ते नवी दिल्लीत रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या १ लाख लोकांना कर्जवाटप करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. रस्त्यावरचे हे व्यवसायिक लहान असले तरी त्यांची स्वप्नं मोठी आहेत. या आधीच्या सरकारांनी त्यांच्या विकासाकडे लक्ष दिलं नाही. त्यामुळे त्यांना उपेक्षेचं आणि कष्टाचं जीवन जगावं लागत होतं, असं ते म्हणाले. फेरीवाल्यांना अधिक व्याजदरानं कर्ज घ्यावे लागत होते. त्यांना बँकेतून कर्ज मिळत

नव्हती. त्यांचे प्रश्न सोडवण्याचा किंवा त्यांना मदत करण्याचा कोणीही विचार करत नव्हतं असंही त्यांनी यावेळी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्याच्या कामाची पायाभरणी करण्यात आली.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक विषयक उच्चस्तरीय समितीकडे मतं आणि सूचना नोंदवणाऱ्या ४७ पैकी ३२ राजकीय पक्षांनी एकाचवेळी निवडणुका घेण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला आहे. देशभरातल्या नागरिकांनी २१ हजारांहून अधिक सूचना या समितीला पाठवल्या आणि त्यातल्या ८० टक्क्यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला आहे.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या उच्चस्तरीय समितीनं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना अहवाल सादर केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. समितीनं सादर केलेला अहवाल १८ हजार ६२६ पानांचा आहे.

पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि देशभरातल्या सर्व विधानसभांच्या निवडणुका एकत्र घेण्याची शिफारस एक राष्ट्र एक निवडणूक समितीनं आज केली. दुसऱ्या टप्प्यात लोकसभा, विधानसभा यांच्या निवडणुकांनंतर १०० दिवसात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका करण्याची शिफारस आहे. या सर्व निवडणुकांसाठी एकसमान मतदार यादी आणि मतदार ओळखपत्र असावं, असंही समितीनं म्हटलंय.

<><><><><>

सध्याच्या जागतिक परिस्थितीमध्ये कौशल्य विकासाला अधिक महत्व असल्याचं केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. केंद्रीय कौशल्य विकास मंत्रालयानं विविध शैक्षणिक संस्थांबरोबर १९ सामंजस्य करार केले. यामध्ये अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालय,कामगार मंत्रालय, आयआयटी मंडी आणि भारतीय जेम्स आणि ज्वेलरी संस्थेचा समावेश आहे. त्यावेळी ते बोलत होते.

केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री स्मृती इराणी यांनी शिख समुदायासाठी काही कौशल्य विकास कार्यक्रमांचीही आज सुरुवात केली.

<><><><><>

देशातील बड्या उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले जाते मग, या देशातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ का होऊ शकत नाही. केंद्रात इंडिया आघाडीची सत्ता आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यात येईल, असं आश्वासन काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी यांनी आज नाशिकमध्ये  दिले. राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेनिमित्त आज जिल्ह्यातील चांदवड येथे आयोजित सभेत ते बोलत होते.

देशात महागाई, बेरोजगारी, भागीदारी, धर्म आणि शेतकरी अशा अनेकांच्या समस्या आहोत. शेतकरी समस्याग्रस्त असून त्यांच्या समस्यांवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल, स्वामीनाथन आयोगांच्या शिफारसीनुसार किमान आधारभूत किंमत देण्यात येईल, असंही ते म्हणाले. देशात जीएसटीच्या

माध्यमातून शेतकऱ्यांवर प्रथमच लागू करण्यात आलेला कर मागे घेण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं.

निर्यातबंदी आणि अन्य समस्यांमुळे शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागत आहेत, अशी टीका राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी केली तर केंद्रशासनाने कांदा निर्यात बंदी करून शेतकऱ्यांना देशोधडीला लावले आहे, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी केली. दरम्यान, राहुल गांधी यांनी पिंपळगाव बसवंत, ओझर आणि नाशिक इथं रोड शो केला. त्यानंतर त्र्यंबकेश्वर येथे जाऊन दर्शन देखील घेतले.

<><><><><>

घाऊक भावावर आधारित महागाईचा दर गेल्या महिन्यात २ दशांश टक्के इतका नोंदवला गेला. गेल्या चार महिन्यांमधला हा नीचांक आहे. जानेवारीमध्ये हा दर २७ शतांश टक्के होता.

<><><><><>

जीआयआय, अर्थात  लैंगिक असमानता निर्देशांक २०२२ मध्ये भारतानं १४ स्थानांनी झेप घेतली आहे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमानं जारी केलेल्या मानव विकास अहवाल २०२३-२४ नुसार, जीआयआय २०२२ मध्ये भारत एकूण १९३ देशांमध्ये  १०८ व्या क्रमांकावर आहे. जीआयआय २०२१ मध्ये भारत १९१ देशांमध्ये १२२ व्या क्रमांकावर होता. गेल्या १० वर्षांमध्ये देशाच्या जीआयआय निर्देशांकामधे लक्षणीय सुधारणा झाली असून, ही कामगिरी देशाची लिंग समानतेमधली प्रगती दर्शवत असल्याचं महिला आणि बाल विकास मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी माजी सनदी अधिकारी ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांची देशाचे नवे निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक केली आहे. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयानं यासंदर्भात आदेश रात्री जारी केला. सकाळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेतले काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी यांचा समावेश असलेल्या समितीनं या दोघांच्या नावांची शिफारस राष्ट्रपतींना केली होती.

राजीव कुमार सध्या मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. अरुण गोयल यांनी राजीनामा दिल्यानं तसंच अरुप चंद्र पांडे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानं ही पदं रिक्त होती.

<><><><>

अजित पवार यांच्या पक्षानं शरद पवार यांचं नाव आणि फोटो वापरु नये असे आदेश आज सर्वोच्च न्यायालयानं दिले. या बाबत दोन दिवसांत हमीपत्र लिहून देण्याचेही आदेश दिले आहेत. तसंच घड्याळ चिन्हाऐवजी दुसरं चिन्ह वापरण्याच्या पर्यायावर विचार करण्याचा सल्लाही न्यायालयानं आज दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चिन्ह आणि नावाबद्दल निवडणूक आयोगानं दिलेल्या निर्णयला शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. या प्रकरणाच्या सुनावणीत आज सर्वोच्च न्यायालयानं हे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली.

<><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधान परिषदेच्या सदस्यांच्या अपात्रता अर्जावर उद्यापासून सुनावणी सुरू होणार आहे. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यासमोर ही सुनावणी होईल. जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांनी रामराजे नाईक-निंबाळकर, सतीश चव्हाण, अनिकेत तटकरे, विक्रम काळे, अमोल मिटकरी यांच्याविरोधात अर्ज दिला आहे. तर अमोल मिटकरी यांनी एकनाथ खडसे, शशिकांत शिंदे आणि अरुण लाड यांच्याविरोधात अर्ज दिला आहे.

<><><><>

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्रधिकरणानं देशातील शंभर कारागृहांना इंट राईट कॅम्पस प्रमाणित केलं आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार यामधील अनेक कारागृहे ही उत्तर प्रदेश, पंजाब, बिहार आणि मध्य प्रदेशातील आहेत. यामध्ये दिल्लीतील तिहार, बिहारच्या गया मधील मध्यवर्ती कारागृह त्याचप्रमाणे पंजाबमधील आधुनिक कारागृहाचा समावेश आहे. याद्वारे कारागृहातील कैद्यांना आणि कर्मचाऱ्यांना पौष्टिक आहार उपलब्ध करुन दिला जाणार आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकार आणि आशियाई विकास बँक यांनी आज गुजरात इंटरनॅशनल फायनान्स टेक-सिटी इथं २ कोटी ३० लाख डॉलर्सच्या कर्ज करारावर स्वाक्षरी केली. भारतातली फिनटेक प्रणाली मजबूत करणं हा या करारामागचा उद्देश आहे. हा प्रकल्पाअंतर्गत आंतरराष्ट्रीय फिनटेक संस्था स्थापन करणार असल्याचं अर्थमंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. यामुळे रोजगाराच्या संधी, आणि तंत्रज्ञानामध्ये उत्पादकता वाढेल.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल मधल्या संदेशखळी इथं ईडीच्या पथकावर झालेल्या हल्ल्यातला आरोपी शाहजहान शेखला आज बसिरहाट उपविभागीय न्यायालयानं आठ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात अटक झालेल्या इतर सात जणांनाही न्यायालयानं पाच दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. दरम्यान, शाहजहान शेखच्या आयात-निर्यात व्यवसायाची चौकशी करण्यासाठी ईडीच्या पथकानं आज संदेशखळीत भेट दिली.

<><><><><>

निवडणूक आयोगानं निवडणूक रोख्यांची माहिती त्यांच्या वेबसाइटवर प्रकाशित केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्टेट बँकेनं परवा आयोगाला ही माहिती दिली होती.

<><><><><>

अभ्युदय बँकेच्या संचालक मंडळाच्या कामकाजावर देखरेख करण्यासाठी नेमलेल्या प्रशासकांच्या सल्लागार समितीवर स्टेट बँकेचे माजी मुख्य सरव्यवस्थापक देवेंद्र कुमार यांची नियुक्ती रिझर्व्ह बँकेनं केली आहे. यापूर्वीचे सदस्य महेंद्र छाजेड यांनी राजीनामा दिल्यानं ही नियुक्ती झाली आहे. प्रशासक सत्य प्रकाश यांच्या सल्लागार समितीत व्यंकटेश हेगडे आणि सुहास गोखले यांचाही समावेश आहे.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई संघानं ४२ वा विजय नोंदवला असून अंतिम सामन्यात मुंबईच्या संघानं विदर्भ संघाचा १६९ धावांनी पराभव केला. विजयासाठीचं ५३८ धावांचं आव्हान घेऊन मैदानात उतरलेला विदर्भाचा संघ ३६८ धावात गारद झाला.

या सामन्यात विदर्भ संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्विकारलं. मुंबईनं आपल्या पहिल्या डावात २२४ धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देतांना विदर्भाचा पहिला डाव केवळ १०५ धावांमध्ये संपुष्टात आला होता. मुंबईनं आपल्या दुसऱ्या डावात ४१८ धावा करत विदर्भ संघापुढं विजयासाठी ५३८ धावाचं आव्हानं दिलं. त्याचा

पाठलाग करतांना विदर्भाला केवळ ३६८ धावाचं करता आल्या. मुंबईच्या दुसऱ्या डावात शानदार शतक झळकावणारा मुशीर खान सामनावीर ठरला असून संपूर्ण उत्तम कामगिरी करणारा तनुष कोटियन मालिकावीर ठरला आहे.